# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई ४०० ०६५.

---

क्रमांक: कलागारे-२०२४/ म.चि.मा. सवलत/ ७६

दिनांक : १३.०३.२०२४

## परिपत्रक

विषय: मराठी चित्रपट / मालिकांना १ वर्षाच्या कालावधीकरिता देण्यात येणारी ५०% सवलत ही १ वर्षाकरिता न देता कायमस्वरुपी देण्याबाबत.

महामंडळाच्या संचालक मंडळाच्या वेळोवेळी पारित केलेल्या ठरान्वये कलागारे व बाह्य चित्रीकरण स्थळांचे भाडे निश्चिती करण्यात आली आहेत.

सध्या प्रचलित पध्दतीनुसार चित्रनगरी परिसरातील बाह्य चित्रीकरण स्थळांकरिता / कलागारांकरिता मराठी निर्मिती संस्थांना त्यांच्या मराठी चित्रपटाकरिता / मालिकेकरिता १ वर्षाच्या कालावधीकरिता देण्यात येणारी ५०% सवलत ही १ वर्षाकरिता देण्यात येत आहे. तद्नंतर दुसऱ्या वर्षाकरिता चित्रपट / मालिकेकरिता २५% सवलत देण्यात येत होती.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या स्थापनेचा मूळ उद्देश हा निर्मिती संस्थांना महामंडळाच्या परिसरात चित्रीकरणासाठी सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे. विशेषत: मराठी भाषेतील चित्रपट / मालिकांना प्रोत्साहन देणे असल्यामुळे तसेच हिंदी चित्रपट / मालिकांच्या तुलनेत मराठी चित्रपट / मालिकांचे निर्मिती संस्था या व्यावसायिक व आर्थिक दृष्टया सक्षम नसल्याने मराठी चित्रपट / मालिका निर्मिती संस्थांना प्रोत्साहन व सवलत देणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने मराठी निर्मिती संस्थांनी वेळोवेळी केलेल्या सवलतीबाबतच्या प्रस्तावाचा विचार करुन दि. ०५.०३.२०२४ रोजीच्या मा. संचालक मंडळाच्या चक्रिय ठराव क्र.७/२०२४ अन्वये मान्य झालेल्या खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

१. मराठी चित्रपट/मालिकांना भाडे निश्चितीबाबत, सोयी-सुविधांबाबत १ वर्षाच्या कालावधीकरिता देण्यात येणारी ५०% सवलत ही १ वर्षाकरिता न देता चित्रपट / मालिका पूर्ण होईपावेतो सरसकट देण्यात यावी. मात्र ही सवलत घेतल्यास मराठी निर्मिती संस्थांना १०: २०: ३० दिवसांची भाडेदरातील सवलत लागू राहणार नाही.

Scanned with OKEN Scanner

२. मराठी भाषेतील Reality Show, Game Show, Dance Show कथाबाह्य / कथानक नसलेल्या कार्यक्रमांच्या चित्रीकरणासाठी १ वर्षाच्या कालावधीपर्यंत भाड्याच्या २५% सूट देण्यात येणारी सवलत जशीच्या तशी लागू राहील.

३. तसेच मा. संचालक मंडळाच्या दि.१७.११.२०२२ रोजीच्या बैठक क्र. १६०/०९ अन्वये दुस-या वर्षाकरिता देण्यात येणाऱ्या २५% सवलत देण्याबाबतचा ठराव याव्दारे अधिक्रमित करण्यात येत आहे.

उपरोक्त दि.०५.०३.२०२४ रोजीच्या मा. संचालक मंडळाच्या चक्रिय ठराव क्र.७/२०२२४ अन्वये मान्य झालेल्या ठरावान्ये सदर सवलत ही दि.०१.०४.२०२४ पासून व त्यानंतर आरक्षण करण्यात येणाऱ्या मराठी निर्मिती संस्थांना लागू राहील.

व्यवस्थापक (कलागारे)

प्रति,

सर्व निर्मिती संस्था

प्रत,

१. मा. व्यवस्थापकीय संचालक यांचे माहितीस्तव सविनय सादर.

२. सह व्यवस्थापकीय संचालक माहितीस्तव सादर.

Scanned with OKEN Scanner